# राष्ट्रीय आरोग्य अभियान

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर

## समुदाय आरोग्य अधिकारी पदभरती

सन २०२२-२३

## सुचना

दि.२२ जानेवारी २०२३ रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ यांचे स्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी पदाकरीता घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेसाठी नागपूर जिल्हयांत एकूण ९४७ उमेदवार पात्र होते. सदर प्रवेश परिक्षेचा अंतिम निकाल दि.३१ जानेवारी २०२३ रोजी आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामध्ये ८७० उमेदवारांना ४० पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत.

सदर पात्र यादीतील गुणानुक्रमे अग्र असलेले (**एकूण ४८ रिक्त पदांच्या १.५ टक्केप्रमाणे**) एकूण ६७ पात्र/अपात्र उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रसिध्द यादीबाबत उमेदवारांना काही आक्षेप असल्यास आपण आपला आक्षेप **मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर या नावाने लेखी स्वरुपात लिहून दि. १७/०३/२०२३ रोजी सायंकाळी ६.१५ मीनीट पर्यंत cphcnagpur@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा.**

वरील नमूद तारखेनंतर प्राप्त होणारे आक्षेप स्वीकारले जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**टिप - खुल्या प्रवर्गामध्ये भरावयाच्या एकूण ३० पदांपैकी २ पदे खेळाडू व २ पदे प्रकल्पग्रस्ताकरीता राखीव आहेत. प्रवेश पात्रता परिक्षेत ४० गुणांपेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांकडे खेळाडू किवा प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र असतील त्या उमेदवारांनी सदर प्रमाणपत्र विनंती अर्जासह वरील नमूद तारखेपर्यंत या कार्यालयात सादर करावे. त्यानुसार समांतर आरक्षणानुसार खेळाडू व प्रकल्पग्रस्ताची रिक्त पदे भरल्या जातील.**

आदेशान्वये<br>
सदस्य सचिव<br>
जि.ए.आ. व कु.क. सो.<br>
तथा<br>
जिल्हा आरोग्य अधिकारी<br>
जिल्हा परिषद, नागपूर